सत्यमेव जयते

समता न्याय एकात्मता

# जिल्हा समाज कल्याण

# दिव्यांग विभाग

## जिल्हा परिषद - अमरावती



## दिव्यांग कल्याण विभाग, दिव्यांगाच्या दारी अभियान...

# दिव्यांग मित्र मार्गदर्शिका

# दिव्यांग मंत्रालयाची घोषणा

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन अधिसूचना दिनांक 15 डिसेंबर 2022 अन्वये राज्यामध्ये दिव्यांग कल्याण विभाग या नवीन विभागाची स्थापना करण्यात आलेली आहे. या विभागास 16 विषय नेमून देण्यात आले आहेत. दिव्यांगांसाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन करणारे महाराष्ट्र हे देशातील एकमेव आणि पहिले राज्य आहे.




मुंबई/पुणे

**दिव्यांगांसाठी CM शिंदेंची मोठी घोषणा, स्वतंत्र मंत्रालय; 2063 पदे, ११४३ कोटींच्या निधीची तरतूद**

By ब्युरो रिपोर्ट, साम टीव्ही, मुंबई

Published: 3rd Dec, 2022 at 8:14 PM






**राज्यात स्वतंत्र अपंग कल्याण विभाग**

मुख्यमंत्र्यांची घोषणा; ११४३ कोटी रुपयांची तरतूद

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी



# भारताचे संविधान


## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडवण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस :

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय** ;
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य** ;
दर्जाची व संधीची **समानता** ;
निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून ;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

# प्रेरणास्थान











# दिव्यांग मित्र मार्गदर्शिकेला हार्दिक शुभेच्छा.....



**मा.ना. श्री. एकनाथ शिंदे**
मुख्यमंत्री



**मा.ना. श्री. देवेंद्र फडणवीस**
उपमुख्यमंत्री तथा
पालकमंत्री अमरावती



**मा.ना. श्री. अजित पवार**
उपमुख्यमंत्री



**मा.ना. श्री. ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू**
(मंत्री दर्जा)
अध्यक्ष व मुख्य मार्गदर्शक,
दिव्यांग कल्याण विभाग दिव्यांगाच्या दारी अभियान.



**मा.श्री. सुमंत भांगे** (भा.प्र.से.)
सचिव, सामाजिक न्याय व
विशेष सहाय्य विभाग



**मा.श्री. अभय महाजन** (भा.प्र.से.)
सचिव, दिव्यांग कल्याण



**मा.डॉ. ओम प्रकाश बकोरिया** (भा.प्र.से.)
आयुक्त, समाज कल्याण



**मा.श्री. विष्णूदास घोडके**
आयुक्त, दिव्यांग कल्याण



**मा.डॉ. निधि पांडेय**
विभागीय आयुक्त, अमरावती



**मा.श्री. सौरभ कटियार** (भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी
जिल्हा अमरावती



**मा.श्री. अविशांत पंडा** (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद अमरावती.



**मा.श्री. संतोष जोशी**
अति. मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद अमरावती.



**मा.श्री. चंद्रशेखर खंदारे**
मुख्य लेखा व वित्त अधिकारी
जिल्हा परिषद अमरावती.



**मा.श्री. सुनिल वारे**
प्रादेशिक उपायुक्त,
समाज कल्याण विभाग, अमरावती



**श्री. राजेंद्र जाधवर**
जिल्हा समाज कल्याण अधिकारी.
जिल्हा परिषद अमरावती.



**श्री. पी.डी. शिंदे**
सहाय्यक सल्लागार, दिव्यांग विभाग
जिल्हा परिषद अमरावती.

# शुभेच्छा संदेश



**मा.श्री. सौरभ कटियार** (भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी
जिल्हा अमरावती

समाजामध्ये दिव्यांग व्यक्ती हा एक महत्त्वपूर्ण घटक आहे. दिव्यांग व्यक्तींच्या विकासामध्ये शिक्षण, प्रशिक्षण, पुनर्वसन आणि त्यांच्यासाठी कल्याणकारी योजना यांचा मोलाचा वाटा आहे. दिव्यांगांचे हक्कांचे संरक्षण व्हावे, त्यांना समान संधी उपलब्ध व्हाव्यात आणि सर्व क्षेत्रांमध्ये त्यांचा सहभाग वाढावा यासाठी शासनाकडून विविध योजना / कार्यक्रम आणि उपक्रम राबविले जातात. तसेच याबाबत वेळोवेळी कायदे केले आहेत.

दिव्यांग योजनांची आणि उपक्रमांची प्रचार आणि प्रसिद्धी होणे आवश्यक आहे. याद्वारे दिव्यांगांना विविध योजनांचा लाभ घेता येईल. सदर योजना आणि उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. सदर पुस्तिका दिव्यांग क्षेत्रामध्ये कार्य करणाऱ्या संस्था आणि नागरिक यांना उपयुक्त ठरेल असा विश्वास वाटतो.

या दिव्यांग मार्गदर्शिका पुस्तिकेस माझ्या हार्दिक शुभेच्छा..!

---



**मा. श्री. अविशांत पंडा** (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद अमरावती.

केंद्र शासन आणि राज्य शासन तसेच स्थानिक स्वराज्य संस्था यांचेमार्फत दिव्यांग व्यक्तींसाठी अनेक योजना, उपक्रम/ प्रकल्प राबविण्यात येतात. जिल्हा परिषदेमार्फत स्वउत्पन्नाच्या पाच टक्के दिव्यांग निधी मधून दिव्यांग कल्याणाच्या सामूहिक तसेच वैयक्तिक योजना राबविण्यात येतात..दिव्यांग कल्याण निधीमधून अनेक उपक्रम/ योजना राबविल्या जातात. दिव्यांग व्यक्तींना या सर्व योजनांची माहिती असणे आवश्यक आहे जेणेकरुन त्यांना शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांचा लाभ घेता येईल.

दिव्यांग कल्याण विभाग अमरावतीमार्फत दिव्यांगांसाठीचे काही महत्त्वाचे कायदे, योजना/ उपक्रम तसेच दिव्यांग शाळांमधून होत असलेले क्रीडा, शैक्षणिक आणि सांस्कृतिक उपक्रम या सर्वांचे संकलन या पुस्तिकेमध्ये करण्यात आलेले आहे. शहरी, ग्रामीण तसेच दुर्गम भागातील दिव्यांग व्यक्ती आणि सामान्य नागरिक यांना ही पुस्तिका उपयुक्त ठरेल असा विश्वास आहे.

या दिव्यांग मार्गदर्शिका पुस्तिकेस माझ्या हार्दिक शुभेच्छा..!

# शुभेच्छा संदेश



**मा. श्री. सुनिल वारे**
**प्रादेशिक उपायुक्त,**
**समाज कल्याण विभाग, अमरावती.**

दिव्यांग व्यक्ती हा सुद्धा समाजाचा घटक आहे. त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील करुन घेण्यासाठी शासन स्तरावरुन अनेक शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, आणि कल्याणकारी योजना, उपक्रम/ कार्यक्रम राबविले जातात. दिव्यांगांना त्यांच्यासाठीच्या असलेल्या योजना/ कार्यक्रम सवलती इत्यादींची माहिती असणे आवश्यक आहे. दिव्यांगांच्या विकासामध्ये त्यांचे शिक्षण, प्रशिक्षण यांचे खूप मोठे स्थान आहे. यासाठी शासनाने शासन स्तरावरुन आणि स्वयंसेवी संस्थामार्फत दिव्यांग शाळा/ कर्मशाळा, शैक्षणिक संस्था चालविल्या जातात. तसेच शासनामार्फत कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी केली जाते.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय दिनांक 13 सप्टेंबर 2022 अन्वये 21 प्रवर्गातील दिव्यांग लाभार्थी यांना राज्य व तत्सम यंत्रणांच्या योजना, सवलती लाभ, अनुदान व इतर फायदे यांचा लाभ घेण्यासाठी ग्राह्य ठरविण्यात आलेले आहे दिव्यांगांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांना त्यांच्यासाठी असलेल्या योजनांचा लाभ मिळणे आवश्यक आहे . यासाठी दिव्यांगांसाठीचे प्रचलित कायदे योजना उपक्रम यांचा प्रसार व प्रचार होणे आवश्यक वाटते. दिव्यांग विभाग, जिल्हा परिषद, अमरावती यांचे मार्फत प्रकाशित केले जात असणारे दिव्यांग मार्गदर्शिका सर्व दिव्यांग बांधव आणि सामान्य नागरिक यांना उपयुक्त ठरेल असा विश्वास वाटतो.

या दिव्यांग मार्गदर्शिका पुस्तिकेस माझ्या हार्दिक शुभेच्छा..!

# प्रस्तावना



**श्री. राजेंद्र जाधवर**
**जिल्हा समाज कल्याण अधिकारी.**
**जिल्हा परिषद अमरावती.**

समाजातील दृष्टीहीन, कर्णबधिर, अस्थिव्यंग, मनोविकलांग व कुष्ठरोग मुक्त दिव्यांग व्यक्तीकडे, त्यांच्या दिव्यांगात्वाकडे न पाहता त्यांच्यामध्ये असलेल्या सामर्थ्याकडे पाहून, त्यांच्यामधील सुप्त सामर्थ्य विकसित करुन त्यांना समाजजीवनाच्या सर्व अंगामध्ये समान संधी, संपूर्ण सहभाग व त्यांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे या दृष्टीने शासनाच्या वतीनेअनेक कल्याणकारी योजना / कार्यक्रम राबवण्यात येतात.

दिव्यांगांसाठी अपंग व्यक्ती समान संधी हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग अधिनियम 1995 या केंद्रीय कायद्याची अंमलबजावणी करण्यात आली आहे. तसेच दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम 2016 हा नवीन अधिनियम 28/12/2016 रोजी अधिसूचित केला गेला आहे. याद्वारे दिव्यांग व्यक्तींना समान संधी व हक्क प्रदान करण्यात आलेले आहेत. त्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्याचे दिव्यांग धोरण 2018 नुसार महाराष्ट्र शासनाने दिव्यांगाचे धोरण अमलात आणलेले आहे.

महाराष्ट्र शासन राजपत्र सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना दिनांक 15 डिसेंबर 2022 नुसार दिव्यांग कल्याण विभाग या नवीन विभागाची स्थापना करण्यात आलेली आहे. केंद्र शासन आणि राज्य शासन दिव्यांगांसाठी अनेक योजना, कार्यक्रम / प्रकल्प राबवत आहे. या सर्वांचे सामान्य दिव्यांग व्यक्तींना माहिती असणे आवश्यक आहे. यासाठी दिव्यांग मार्गदर्शिकेची निर्मिती करण्यात येत आहे. सदर दिव्यांग मार्गदर्शिका पुस्तिकेमध्ये दिव्यांगांसाठीचे असणारे महत्त्वाचे शासन निर्णय, परिपत्रके कायदे योजना कार्यक्रम दिव्यांग शाळेतील उपक्रम यांचे संकलन करण्यात आले आहे. अमरावती जिल्ह्यामध्ये मागील दोन वर्षांमध्ये कार्यालयामार्फत राबविलेले कार्यक्रम, जिल्ह्यातील शाळांमध्ये सुरु असलेले नाविन्यपूर्ण उपक्रम, दिव्यांग क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव, शाळेतील काही मुख्याध्यापक, शिक्षक यांचे उल्लेखनीय कार्य इ. बाबींचा या पुस्तिकेमध्ये समावेश करण्यात आलेला आहे. अमरावती जिल्हा दिव्यांग शिक्षण, क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम, आणि योजनांची अंमलबजावणी यामध्ये महाराष्ट्रात अग्रेसर राहिलेला जिल्हा आहे. दिव्यांग शाळेतील शिक्षण, प्रशिक्षण, सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडा स्पर्धा आणि विविध उपक्रम यांचा सर्वांना या निमित्ताने परिचय होईल. या बाबींचा उपयोग ग्रामीण दुर्गम भागातील दिव्यांग बांधव, स्वयंसेवी संघटना / संस्था आणि सामान्य नागरिक यांना होईल असा विश्वास वाटतो.

सदर पुस्तिका तयार करताना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मनापासून धन्यवाद !

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशिल | पान क्र. |
|---|---|---|
| 1 | दिव्यांग आयुक्तालय पुणे | 8 |
| 2 | महत्त्वाचे कायदे | 9 |
| 3 | महत्त्वाच्या योजना | 13 |
| 4 | शिष्यवृत्ती योजना | 18 |
| 5 | अमरावती जिल्ह्यातील विशेष शाळा - यादी | 21 |
| 6 | जिल्हा दिव्यांग पुर्वसन केंद्र अमरावती | 23 |
| 7 | दिशा प्रकल्प | 24 |
| 8 | UDID Card | 26 |
| 9 | दिव्यांग सहायता कक्ष | 28 |
| 10 | शाळांमधील नाविन्यपुर्ण उपक्रम | 29 |
| 11 | अंबा  फेस्टिवल | 31 |
| 12 | 3 डिसेंबर - जागतिक दिव्यांग दिन | 32 |
| 13 | क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक महोत्सव 2023 | 34 |
| 14 | राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा 2023 | 39 |
| 15 | माजी विध्यार्थी यशोगाथा | 40 |
| 16 | दिव्यांग शाळेतील व्यक्ती विशेष | 41 |
| 17 | किरण मेटकर आंतरराष्ट्रीय दिव्यांग खेळाडू | 44 |
| 18 | दिव्यांग दिन विशेष | 44 |
| 19 | दिव्यांगत्वाचे 21 प्रकार - माहिती | 45 |
| 20 | दिव्यांग शाळेतील भोजनाचा "अमरावती पॅटर्न" | 48 |
| 21 | महत्वाचे शासन निर्णय / परिपत्रके | 49 |


# सर्वसाधारण माहिती - दिव्यांग आयुक्तालय पुणे

अपंग व्यक्ती समान संधी हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग अधिनियम 1995 मधील कलम 60 अन्वये अपंग कायद्याची अंमलबजावणी करण्याकरिता शासन निर्णय दिनांक 19 ऑगस्ट 2000 अन्वये स्वतंत्र दिव्यांग कल्याण आयुक्तालयाची निर्मिती करण्यात आली आहे . दिव्यांग कल्याण आयुक्तालयाच्या नियंत्रणाखाली दिव्यांग व्यक्तीसाठी शिक्षण, प्रशिक्षण व पुनर्वसनाच्या योजना जिल्हा परिषदेच्या माध्यमातून राबविण्यात येत आहेत. दिव्यांग कल्याण आयुक्तालयाचे मुख्यालय पुणे येथे आहे, महाराष्ट्र शासन राजपत्र सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना दिनांक 15 डिसेंबर 2022 नुसार दिव्यांग कल्याण विभाग या नवीन विभागाची स्थापना करण्यात आलेली आहे.

## दिव्यांग लोकसंख्या सन 2011 च्या जनगणनेनुसार

| | एकूण लोकसंख्या (कोटी) | दिव्यांगाची लोकसंख्या (कोटी) | एकूण दिव्यांगांच्या लोकसंख्येची टक्केवारी |
|---|---|---|---|
| भारत | 121 | 2.68 | 2.21 |
| महाराष्ट्र | 11.23 | 0.2963 | 2.63 |

टीप - दिव्यांगत्वाचे सात प्रकार दिव्यांग व्यक्ती (समान संधी हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग ) अधिनियम 1995 नुसार होते. सद्यस्थितीमध्ये माहे एप्रिल 2017 पासून दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम 2016 अमलात आला असून, त्यामध्ये दिव्यांगत्वाचे एकूण 21 प्रकार आहेत. यानुसार दिव्यांग व्यक्तींची लोकसंख्या सद्यस्थितीमध्ये वाढेल.



# महत्वाचे कायदे

## ● राष्ट्रीय विश्वस्त कायदा 1999 (नॅशनल ट्रस्ट)

राष्ट्रीय ट्रस्ट ही भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्रालयाखाली येणारी वैधानिक संस्था आहे, जी, ऑटिझम, मेंदूला पक्षाघात, मानसिक अपंगत्व आणि मल्टिपल डिसेबिलिटी असलेल्या व्यक्तींच्या कल्याणासाठी स्थापन करण्यात आलेल्या राष्ट्रीय ट्रस्ट कायद्याखाली (1999 च्या 44 व्या कलमान्वये) स्थापन करण्यात आली आहे.

## Legal Guardianship मतिमंद मुलांच्या कायदेशीर पालकत्वाबाबत

**1) आत्ममग्न (Autism)**
**2) मेंदुचा पक्षाघात (Cerebral Palsy)**
**3) मतिमंद (Mental Retardation)**
**4) बहुविकलांगत्व (Multiple Disabilities)**

असलेल्या व्यक्तीकरिता राष्ट्रीय न्यास (The National Trust for Welfare of persons with Autism, Cerebral palsy, Mental Retardation & Multiple Disabilities Act 1999 ) अंतर्गत
1999 मध्ये कायदा संमत झाला.

आतापर्यंत कायद्याअंतर्गत 18 वर्षांपर्यंतच्या मुलांचे पालकत्व आई-वडीलांकडे कायदेशीर होते. 18 वर्षांनंतर मुले सज्ञान झाल्यामुळे आईवडीलांचे पालकत्व आपोआपच रद्द होते. परंतू 18 वर्षावरील मतिमंद मुले स्वत्तः निर्णय घेण्यास सक्षम नसल्याकारणाने आईवडिलांनाच अशा मुलांची जबाबदारी कायदेशीररित्या स्वीकारण्याकरिता National Trust Act 1999 अन्वये आता प्रथमच 18 वर्षावरील मतिमंद व्यक्तीच्या आईवडिलांना अधिकार दिलेला आहे.

## पालकत्वाचे प्रकार

1) व्यक्तीकरिता पालकत्व
2) व्यक्ती व व्यक्तीचे मालमत्ते करीता पालकत्व

## मतिमंद व्यक्तीकरीता कायदेशीर पालकाची आवश्यकता का?

1) मतिमंद व्यक्तीकरिता कर्ज घेणे, विविध योजनांद्वारे देण्यात येणाऱ्या सुविधा उपभोगण्यासाठी कायदेशीर पत्र व्यवहार करण्याकरिता.
2) मतिमंद व्यक्तीच्या नावावर केलेल्या गुंतवणुकीची कायदेशीर व्यवस्था व देखभालीकरिता.
3) मतिमंद व्यक्तीचे नावावर बँक खाते उघडण्याकरिता व चालविण्याकरिता.
4)मतिमंद व्यक्तीच्या कायदेशीर अधिकारांचे संरक्षणाकरिता.
उदा. : काही कारणास्तव मतिमंद व्यक्तीस एखाद्या गुन्ह्या अंतर्गत जर सजा होत आहे अशा परिस्थीतीत मतिमंद व्यक्तीच्या वतीने कायदेशीर पालकाची आवश्यकता उद्भवते.
5) मतिमंद व्यक्तीच्या आईवडिलांचे मृत्युनंतर अशा व्यक्तीच्या कायदेशीर देखभालीकरीता पालकत्व आवश्यक आहे.

## कोण पालकत्व स्वीकार करु शकते.

1) आई - वडील / किंवा नातेवाईक

2) ज्या मुलांचे आई वडील किंवा नातेवाईक पालकत्व स्वीकार करत नसतील असे वेळी लोकल लेव्हल कमेटी अशा संस्था ज्या राष्ट्रीय न्यास यांचेशी पंजीकृत आहे, व निवासी व्यवस्था आहे. त्यांना पालकत्व स्वीकारण्यासाठी सूचना देऊ शकते!



मा. जिल्हाधिकारी यांच्या हस्ते पालकत्व प्रमाणपत्राचे वाटप

## कायदेशीर पालकत्वाच्या नियुक्तीचे अधिकार कोणाला आहे ?

मतिमंद व्यक्तीचे कायदेशीर पालकाचे नियुक्तीचे अधिकार National Trust 1999 अंतर्गत प्रत्येक जिल्हास्तरावर स्थापन केलेल्या Local Level Committee ला आहेत.



## पालकत्वासाठी आवश्यक असणारे प्रमाणपत्रे

| लाभार्थी कागदपत्रे | पालकांचे कागदपत्रे |
|---|---|
| 1. अपंगत्वाचा दाखला (c.s) | 1. आधारकार्ड 2. जन्म दाखला |
| 2. वैश्वीक ओळखपत्र (UDID) 3. आधार कार्ड | 3. उत्पन्नांचा दाखला 4. प्रतिज्ञा लेख |
| 4. जन्म नागरीक दाखला | 5. आई वडील यांचेशिवाय इतर कोणी पालकत्व घेत असल्यास कुटूंबातील सर्व व्यक्तींची नाहरकत, प्रतिज्ञालेख प्रमाणपत्र |
| 5. लाभार्थी आणि पालकत्व घेण्याचा एकत्र फोटो | |

वरील प्रमाणे सर्व कागपत्रे एकत्र करुन www.thenationaltrust.gov.in (legal Guardianship Registration) या साईटवर पुर्ण अर्ज भरुन दिव्यांग विभाग, समाज कल्याण विभाग, जि.प. अमरावती येथे सदर करावा.

# महत्वाचे कायदे

## केंद्र शासन दिव्यांग अधिनियम कायदा 2016 मधील महत्वाची कलमे

**कलम 3 (1) :** दिव्यांग व्यक्तींना समानता सन्मान आदर सचोटी विषयी हक्क इतरांप्रमाणे बजावता येईल. हि सुयोग्य शासनाची जबाबदारी असेल.

**कलम 4 (1) :** दिव्यांग स्त्रिया व मुले त्यांचे हक्क इतरांप्रमाणेच उपभोगतील हे सुनिश्चित करण्यासाठी शासन व स्थानिक प्राधिकरणे उपाययोजन करतील.

**कलम 5 (1) :** दिव्यांग असलेल्या व्यक्तींना समाजामध्ये राहण्याचा अधिकार असेल. (2) कोणत्याही विशिष्ट निवासी व्यवस्थेत राहणे दिव्यांगांना बंधनकारक करता येणार नाही. वय लिंग विचारात घेऊन राहण्याकरता आवश्यक असणारी वैयक्ति मदत समाविष्ट आहे. यामध्ये प्रवेश दिला जाईल.

**कलम 6 (1) :** सुयोग्य शासन अपंगत्व असलेल्या व्यक्तिना अत्याचार क्रूर अमानुष किंवा अपमानास्पद वागणुकीपासून संरक्षण देण्यासाठी योग्य उपाय योजना करील.

**कलम 7 (1) :** कोणताही पोलीस अधिकारी ज्याकडे अपंक व्यक्तींशी गैरवर्तन हिंसा किंवा शोषण केले गेल्याची माहिती कळते त्याने पिडीत व्यक्तीस योग्य कायदेशीर मदत करावी. ज्यात मोफत कायदेशीर मदत मिळविण्याचा अधिकार असेल.

**कलम 8 :** अपंग असलेल्यांना धोका सशास्त्र संघर्ष मानवहितवादी आणीबाणी, नैसर्गिक आपत्ती परिस्थितीत समान सुरक्षितता व सरंक्षण मिळेल. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण जिल्हयातील अपंग व्यक्तींच्या तपशिलाची नोंद ठेवेल.

**कलम 9 :** अपंगत्वाच्या कारणांमुळे अपंग व्यक्तीस पालकांपासून वेगळे करता येणार नाही. पाल्याच्या सर्वोत्तम हिताच्या दृष्टीने आवश्यक असल्यामुळे सक्षम न्यायालयाच्या आदेशानुसार असेल तर असे प्रकरण वगळून

**कलम 10 :** अपंग व्यक्तिस पुनरुत्पादन करण्याचा अधिकार तसेच कुटुंब नियोजन माहिती मिळवण्याचा तसेच संमती शिवाय वैद्यकीय प्रक्रियेला सामोरे न जाण्याचा अधिकार असेल.

**कलम 11 :** अपंग व्यक्तीस निवडणूक आयोग मतदानामध्ये सुयोग्यता / सुलभता प्रदान करेल.

**कलम 12 :** अपंग व्यक्तीस भेदभावाशिवाय न्यायालयीन किंवा इतर कोणत्याही पंचायतीमध्ये प्रवेश करण्याचा अधिकार राहिल. उच्च आधाराची गरज असल्यास शासन योग्य त्या आधाराच्या योजना व्यवस्थित राबविण्यासाठी पावले उचलेल इत्यादी.

**कलम 13 :** अपंग व्यक्तीस इतरांप्रमाणे चल, अचल मालमत्तेवर मालकी किंवा वारसाने प्राप्त करण्याचे आर्थिक मुद्दयांना नियंत्रीत करण्याचे बँकेचे कर्ज घेण्याचे हक्क असतील, अपंग व्यक्तीला सहाय्य देणारी कोणतीही व्यक्ती अवास्तव प्रभावाचा वापर करणार नाही. स्वायत्तता सन्मान व खाजगीपणाचा आदर करेल.

**कलम 14 :** अपंग व्यक्ती पालकत्या संबंधी अधिकार आहे.

**कलम 16 :** अपंग व्यक्तीस शिक्षणात सोयी सुविधा मिळण्याचे हक्क आहे.

**कलम 17 :** अपंग व्यक्तीस मोफत शिक्षण, शिष्यवृत्ती शिक्षण संस्था इत्यादी विषयी तरतुदी आहे.

**कलम 19 :** अपंग व्यक्तीच्या व्यवसायीक शिक्षण व स्वयंरोजगार विषयी तरतुदी आहे.

**कलम 20 :** कोणतीही शासकीय आस्थापना अपंग कर्मचारी व्यक्तीशी भेदभाव करणार नाही. वाजवी सोयी आणि योग्य असे अडथळामुक्त व अनुकूल वातावरण निर्माण उपलब्ध करून दिले. अपंगत्वाच्या आधारे बढती / पदोन्नती नाकारले जाणार नाही. सेवेच्या दरम्यान अपंगत्व आलेल्या व्यक्तीला बडतर्फ करणार नाही सभांळत असलेल्या पदासाठी कर्मचारी योग्य ठरत नसेल तर त्याला दुसऱ्या पदावर समावून शक्य नसेल तर त्याला दुसरे योग्य पद मिळेपर्यंत किंवा तो सेवानिवृत्तीच्या वयाला पोहचत नाही तो वर त्याला एकाच सुपर न्युमरी मानद पदावर ठेवले जाऊ शकले. सुयोग्य प्रशासन अपंग कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती आणि स्थालंतरण बद्दल धोरण आखेल..

# महत्वाचे कायदे

## केंद्र शासन दिव्यांग अधिनियम कायदा 2016 मधील महत्वाची कलमे

**कलम 22 :** प्रत्येक अपंग कर्मचारी व्यक्तीचा अभिलेजांची नोंद ठेवेल प्रत्येक रोजगार केंद्र सुध्दा रोजगार शोधणाऱ्या अपंग व्यक्तींचा नोंदवही ठेवतील.

**कलम 23 :** प्रत्येक शासकीय आस्थापना तक्रार निवारण अधिकाऱ्यांची नेमणूक करेल. कर्मचाऱ्यांनी दोन आठवडयाचे आत चौकशी केली.

जाईल. पिडीत व्यक्ती केलेल्या कार्यवाहीने मनसायअपंग समितीला संपर्क करु शकतो.

**कलम 25 :** अपंग व्यक्तीस प्राधान्य क्रमाने आरोग्य सेवा मिळविण्याचा अधिकार आहे.

**कलम 29 :** अपंग व्यक्तीस सांस्कृतीक जिवन आणि इतरांसह मनोरंजक उपक्रमात सहभागी होण्याचा हक्क आहे. अपंग कलाकार आणि लेखकांना त्याची आवड आणि गुनांचा पाठपुरावा करण्यासाठी सुविधा सहाण आणि प्रायोजकत्व हत्यादी अधिकार

**कलम 30 :** अपंग व्यक्तीस क्रिडा विषयक सुविधा मिळविण्याचा हक्क आहे.

**कलम 34 :** अपंग व्यक्तींना किमान 4 % शासकीय आस्थापनामध्ये आरक्षण असेल.

**कलम 35 :** अपंग व्यक्तींना खाजगी क्षेत्रात 5% आरक्षण असेल.

**कलम 37 :** अपंग व्यक्तीस शेत जमीन आणि घरवाट 5% आरक्षण आणि अपंग महिलांना योग्य प्राधान्य

**कलम 38 :** लक्षणीय अपंगत्व असलेल्या व्यक्तीस उच्च सहाय

**कलम 49 :** अपंग व्यक्तीस सुगम्य वाहतुक सुविधा, बस थांबे रेल्वे स्टेशन विमानतळ इत्यादी वरील जागा तिकिट काउंटर, शौचालय इत्यादी अपंग व्यक्तीशी सुसंगत असले

**कलम 74 :** कलम नुसार मुख्य आयुक्त तर कलम 79 नुसार राज्य आयुक्त अपंगांना न्याय देण्यासाठी असतील,

**कलम 84 :** कलम नुसार विशेष न्यायालय तर कलम 85 नुसार विशेष सरकारी वकील अपंगांसाठी असतील

**कलम 88 :** शासन अपंग व्यक्तीसाठी राज्य निधीची तरतुद करेल.

**कलम 89 :** नियमांचे उल्लंघन केल्यास रु.10,000 से 5,00,000/- पर्यंत दंडाची तरतुद.

**कलम 92 :** जो कोणी अपंग व्यक्तीचा सार्वजनिक ठिकाणी अपमान करतो, धमकी देतो मारहाण करतो शक्ती वापर तो अपंग महिलेचा विनयभंग करतो, अपंग व्यक्तीवर ताबा व नियंत्रण मिळवतो अन्न किंवा द्राव्य नाकरतो लैंगिक शोषण करतो कोणत्याही अंगाला किंवा ज्ञानेद्रियाला जखमी करतो सहाय्यक साधनांना क्षती पोहोचवितो किंवा तसा प्रयत्न करतो किंवा हस्तक्षेप करतो. अपंगत्व असलेल्या महिलेवर तिच्या संमतीशिवाय वैद्यकीय प्रक्रिया निर्देशीत करणे किंवा चालविणे ज्यामध्ये गर्भाचा गर्भपात होतो किंवा होण्याची शक्यता असते (मात्र वैद्यकीय ताज्ञांच्या व पालकांच्या व अपंग स्त्रीच्या संमतीने वैद्यकीय प्रक्रिया केली जाऊ शकते) यासाठी 6 महिने ते 5 वर्षापर्यंत तृरुगावासाची तसेच दंडाही होवू शकतो.

**कलम 93 :** जो कोणी अपंग हिताची माहिती दस्तावेज, लेखा किंवा अन्य कागदपत्रे सादर करण्यास अपयशी ठरतो जे त्याचे कर्तव्य आहे. यातील प्रत्येक गुन्हयाबाबतीत जास्तीत जास्त रुपये 25,000/- पर्यंत दंडाची शिक्षा होऊ शकते आणि सततत्याने अपयश आल्यास किंवा नकार दिल्यास दंडाची शिक्षा दिलेल्या मुळ आदेशाचा तारखेपर्यंत पूढील प्रत्येक दिवसासाठी रु.1000/- असेल.

**कलम 96 :** या कायदयातील तरतुदी इतर कोणत्याही कायदयाचा तरतुदीच्या अतिरिक्त असतील ना की त्यांचे महत्व कमी करणाऱ्या ( या कायदयातील तरतुदीचा विस्ताराने अभ्यासक करण्यासाठी निःशक्त व्यक्ती अधिकार विधयक 2015 अभ्यासावा) नसतील.

# महत्त्वाच्या योजना

## दिव्यांग कल्याण आयुक्तालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना

### 1 ) शासकीय संस्था मधून दिव्यांगांचे शिक्षण व प्रशिक्षण

**उद्दिष्टे:** वयाच्या 18 वर्षापर्यंत दिव्यांग मुलांना योग्य अशा वातावरणात मोफत शिक्षणाची सुविधाउपलब्ध करून देणे.

**लाभाचे स्वरुप :**

शासकीय संस्थांमध्ये सहा ते 18 वयोगटातील अंध, कर्णबधिर व अस्थिव्यंग दिव्यांग विद्यार्थ्यांना विशेष शिक्षण पद्धतीने व विशेष शैक्षणिक साहित्याचा वापर करुन मोफत शिक्षणाची सुविधा निवास व भोजनाची विनामूल्य व्यवस्था करण्यात येते. तसेच 18 वर्षावरील दिव्यांग व्यक्तींना रोजगार व स्वयंरोजगार मिळण्याच्या दृष्टीने त्यांचे दिव्यांगत्व विचारात घेऊन दिव्यांगात्वानुरुप विविध कुशल व कुशल व्यवसायाचे प्रशिक्षण मोफत निवास व भोजनाच्या व्यवस्थेसह दिले जाते.

**योजनेच्या प्रमुख अटी :**

विहित नमुन्यामध्ये शासकीय संस्थेकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे अर्जदाराचे दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान 40 टक्के अथवा त्यापेक्षा जास्त असावे अर्जदार महाराष्ट्राचा रहिवासी असावा

---

### 2) स्वयंसेवी संस्थामार्फत अपंगांना विशेष शिक्षण देणाऱ्या अनुदानित विशेष शाळा / कर्मशाळा

**उद्दिष्टे :**

1)विशेष शाळा 6 ते 18 वयोगटातील अपंग विद्यार्थ्यांना मोफत विशेष शिक्षण

2) विशेष कार्यशाळा 18 ते 45 वयोगटातील अपंग किंवा प्रौढ व्यक्तींना मोफत विशेष प्रशिक्षण

**लाभाचे स्वरुप :**

**1) विशेष शाळा-** अंध, मुकबधीर, मतिमंद, अस्थिव्यंग विद्यार्थ्यांना विशेष शिक्षण पद्धतीने व विशेष शैक्षणिक साहित्याचा वापर करुन मोफत शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देणे, यासह निवास व भोजनाची व्यवस्था करणे.

**2) विशेष कार्यशाळा-** अंध, मुकबधीर, मतिमंद व अस्थिव्यंग प्रौढ व्यक्तींना विशेष प्रशिक्षणाद्वारे अपंगत्वानुसार विविध व्यवसायाचे विशेष प्रशिक्षण देणे. यासह मोफत निवास व भोजनाची व्यवस्था करणे.

**स्वयंसेवी संस्थाना अर्थसहाय्य :**

1) वेतन - कर्मचारी आकृतिबंधाप्रमाणे मान्य कर्मचाऱ्यांचे 100 टक्के वेतनखर्च

2) वेतनेत्तर वेतन खर्चाच्या 8 टक्के मर्यादित.

3) इमारत भाडे - सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रमाणपत्राप्रमाणे मान्य क्षेत्रफळाचे 75 टक्के इमारत भाडे.

4) परिपोषण अनुदान अंध, कर्णबधीर व अस्थिव्यंग प्रवर्गातील प्रति विद्यार्थी दरमहा रुपये 1500/- व मतिमंद प्रवर्गासाठी 1650 प्रति विध्यार्थी 10 महिन्याकरिता.

## 3) शालांत पूर्व शिक्षणासाठी अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

| उद्दिष्ट | अपंग विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहित करणे | | |
|---|---|---|---|
| निकष | • इयत्ता 10 वी पर्यंतचे शिक्षण घेणारे अंध, कर्णबधीर व अस्थिव्यंग प्रवर्गातील विद्यार्थी तसेच विशेष शाळेतील मतिमंद विद्यार्थी.<br>• विद्यार्थ्याकडे किमान 40 %किंवा त्यापेक्षा जास्त टक्क्यांचे अपंगत्वाचे प्रमाणपत्र असावे.<br>• विद्यार्थी एकाच इयत्तेत दोन वेळा नापास झालेला नसावा. | | |
| लाभाचे स्वरुप | | इयत्ता | शिष्यवृत्ती दर रुपये |
| | | इयत्ता 1 ली ते 4 थी (कर्णबधीर पायरीवर्गापासून) | दरमहा रुपये 100/- |
| | | इयत्ता 5 वी ते 7 वी | दरमहा रुपये 150/- |
| | | इयत्ता 8 वी ते 10वी | दरमहा रुपये 200/- |
| | | मतिमंद मानसिक विकलांग<br>( नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त विशेष शाळेतील) | दरमहा रुपये 150/- |
| | | अपंग कार्यशाळेतील प्रशिक्षणार्थी | दरमहा रुपये 300/- |

## 4) शालांत परीक्षोत्तर (मॅट्रिकोत्तर शिक्षणासाठी अपंग विद्यार्थ्यांना

| उद्दिष्ट | अपंग विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन करणे. | | | |
|---|---|---|---|---|
| निकष | • इयत्ता 10 वी पुढील शिक्षण घेणारे अंध, कर्णबधीर व अस्थिव्यंग प्रवर्गातील विद्यार्थी विद्यार्थ्याकडे किमान 40%किंवा त्यापेक्षा जास्त टक्क्याचे अपंगत्वाचे प्रमाणपत्र असावे.<br>• विद्यार्थी एकाच इयत्तेत दोन वेळा नापास झालेला नसावा. | | | |
| लाभाचे स्वरुप | | अभ्यासक्रमाचा गट | शिष्यवृत्तीची रक्कम | |
| | | गट अ (वैद्यकीय व अभियांत्रिकी पदवी शिक्षण, अॅग्रीकल्चर, व्हेटरनरी मधील पदवी व पदव्युत्तर शिक्षण) | दरमहा रुपये 1200/- | दरमहा रुपये 550/- |
| | | गट ब (अभियांत्रिकी तांत्रिक, स्थापत्य वैद्यकशास्त्र, पदविका अभ्यासक्रम) | दरमहा रुपये 820/- | दरमहा रुपये 530/- |
| | | गट क ( कला, विज्ञान, वाणिज्य मधील पदव्युत्तर अभ्यासक्रम तसेच व्यावसायिक पदविका अभ्यासक्रम ) | दरमहा रुपये 820/- | दरमहा रुपये 530/- |
| | | गट ड (द्वितीय वर्ष व त्यानंतर पदवीपर्यंतचा अभ्यासक्रम) | दरमहा रुपये 570/- | दरमहा रुपये 300/- |
| | | गट इ (11 वी, 12 वी व पदवी प्रथम वर्षाचा अभ्यासक्रम ) | दरमहा रुपये 380/- | दरमहा रुपये 230/- |
| | शिष्यवृत्तीच्या रक्कमेबरोबर विद्यापीठांना / शिक्षण शुल्क समितीने मान्य केलेले शिक्षण शुल्क, अंध विद्यार्थ्यांना वाचक भत्ता, प्रकल्प टंकलेखन खर्च, अभ्यासदौरा खर्च देण्यात येतो. | | | |

## 5) स्वयंरोजगारासाठी अपंग व्यक्तींना वित्तीय सहाय्य (बीजभांडवल )

| उद्दिष्ट | अपंग व्यक्तींना लघुउद्योगांसाठी वित्तीय सहाय्य उपलब्ध करून देणे. |
|---|---|
| निकष | • वार्षिक उत्पन्न रुपये 1.00 लाखापेक्षा कमी असावे.<br>• अपंग व्यक्तीचे किमान 40%किंवा त्यापेक्षा जास्त टक्क्यांचे अपंगत्वाचे प्रमाणपत्र असावे.<br>• वय 18 ते 50 वर्षे यामधील असावे.<br>• महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. |
| लाभाचे स्वरुप | रुपये 1.50 लाखापर्यंतच्या व्यवसायाकरिता 80 टक्के बँकामार्फत कर्ज व 20 टक्के अथवा कमाल रुपये 30,000/- सबसिडी स्वरुपात अर्थसहाय्य. |

## 6) अपंग व्यक्तींना कृत्रिम अवयव व साधने पुरविणे

| उद्दिष्ट | अपंग व्यक्तींना लघुउद्योगांसाठी वित्तीय सहाय्य उपलब्ध करून देणे. |
|---|---|
| निकष | • अपंग व्यक्ती कडे किमान 40 %किंवा त्यापेक्षा जास्त टक्क्याचे अपंगत्वाचे प्रमाणपत्र असावे.<br>• अपंग व्यक्तीचे दरमहा उत्पन्न रुपये 2000/- पेक्षा कमी असावे.<br>• महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.<br>• उपकरणाची साधनाची आवश्यकता असल्याचे तज्ज्ञांचे शिफारसपत्र असावे. |
| लाभाचे स्वरुप | अस्थिव्यंग अपंग व्यक्तींना तीन चाकी सायकल, कृत्रिक अवयव, कुबड्या, कॅलीपर्स इत्यादी साधने तसेच अंध व्यक्तींना चष्मे, काठ्या, इयत्ता 10 वी पुढील अंध व्यक्तींना शिक्षणासाठी टेपरेकॉर्डर, कर्णबधिरांसाठी वैयक्तिक श्रवणयंत्र इत्यादी साधनासाठी रुपये 3000/- पर्यंतचे अर्थसहाय्य उपलब्ध करून देणे. |

## 7) अपंग कल्याण राज्य पुरस्कार

| उद्दिष्ट | गुणवंत अपंग कर्मचारी, स्वयंउद्योजक तसेच त्यांचे नियुक्तकं संस्थांना पुरस्कार देणे |
|---|---|
| निकष | • पुरस्कारासाठी अर्ज करणाऱ्या अपंग कर्मचाऱ्याकडे किमान 40 %किंवा त्यापेक्षा जास्त टक्क्याचे अपंगत्वाचे प्रमाणपत्र असावे.<br>• महाराष्ट्र राज्याचा रहीवासी असावा.<br>• अपंग व्यक्ती शासकीय / सार्वजनिक / खाजगी नोकरीत / स्वयंउद्योजक असावा.<br>• नियुक्तकाच्या बाबतीत जास्तीत जास्त अपंग व्यक्तींना सेवेत घेतले असावे. |
| लाभाचे स्वरुप | 1. अपंग कर्मचारी / अपंग स्वयंउद्योजक रुपये 10000/- रोख शाल, श्रीफळ व प्रमाणपत्र.<br>2. नियुक्तिक संस्थेस रुपये 25000/- रोख, स्मरणचिन्ह, शाल व श्रीफळ |

## 8) अपंग विद्यार्थ्यांना गुणवत्ता पारितोषिके

| उद्दिष्ट | राज्यातील विभागीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामधून इयत्ता 10 वी व 12 वी \| उत्तीर्ण होणाऱ्या प्रथम तीन क्रमाकांच्या प्रत्येकी तीन अपंग विद्यार्थ्यांना गुणवत्ता पारितोषिक देण्यात येते. |
|---|---|
| निकष | राज्यातील इयत्ता 10 वी 12 वीच्या परिक्षांमध्ये विभागीय परिक्षा मंडळामधून प्रत्येक विभाग निहाय गुणवत्ता यादीप्रमाणे अधिक गुण मिळालेले असले पाहिजे. |
| लाभाचे स्वरुप | विभागीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामधून इयत्ता 10 वी व 12 वी उत्तीर्ण होणाऱ्या प्रथम तीन क्रमाकांच्या प्रत्येकी तीन अपंग विद्यार्थ्यांना रुपये 1000/- रोख रक्कम व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात येतो. |

## 9) अपंग-अव्यंग व्यक्तीच्या विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक सहाय्याची योजना

| उद्दिष्ट | अपंग व अपंगत्व असलेल्या व्यक्तीच्या विवाहास प्रोत्साहन देणे व विवाहासाठी आर्थिक सहाय्य करणे. |
|---|---|
| निकष | • विहीत नमुन्यात जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद सर्व व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई शहर / उपनगर यांचेकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे.<br>• अर्जदाराचे अपंगत्व किमान 40 टक्के अथवा त्यापेक्षा जास्त असावे.<br>• अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. |
| लाभाचे स्वरुप | किमान 40 टक्के किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असलेल्या अपंग वधू किंवा वराने अपंगत्व नसलेल्या वधू किंवा वराशी विवाह केल्यास अथवा अपंगत्व नसलेल्या वधू किंवा वराने अपंगत्व असलेल्या वधू किंवा वराशी विवाह केल्यास या योजनेतून खालीलप्रमाणे अर्थसहाय्य देण्यात येईल.<br>अ) रक्कम रुपये 25,000/- चे बचत प्रमाणपत्र.<br>ब) रुपये 20,000/- रोख स्वरुपात.<br>क) रुपये 4,500/- संसार उपयोगी साहित्य / वस्तू खरेदीसाठी देण्यात येईल.<br>ड) रुपये 500/- स्वागत समारंभाच्या कार्यक्रमाचा खर्च करण्यासाठी देण्यात येईल. |

## 10) मतिमंद बालगृहे योजना

| उद्दिष्ट | बालहक्क (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, 2000 व सुधारीत नियम 2006 अन्वये अनाथ \| मतिमंद बालकांसाठी एकूण 19 विशेष बालगृहे स्वयंसेवी संस्थाकडून चालविली जात असून राज्यातील 13 जिल्हयामध्ये ही बालगृहे कार्यरत आहे. |
|---|---|
| निकष | 1. विहीत नमुन्यात बाल कल्याण समिती यांचेकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे.<br>2. अर्जदाराचे अपंगत्व किमान 40 टक्के अथवा त्यापेक्षा जास्त असावे व तो अनाथ असावा.<br>3. अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. |
| लाभाचे स्वरुप | या बालगृहामधील प्रवेशितांना अपंगांच्या विशेष शाळा / कर्मशाळा तसेच वसतिगृहांना असलेल्या निकषानुसारच देखभाल व निर्वाहासाठी अनुदान देण्यात येत असून शैक्षणिक, आरोग्यविषयक सेवा- सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. |
| संपर्क | संबंधीत जिल्ह्याची बाल कल्याण समिती. |

# शिष्यवृत्ती योजना

| अ.क्र. | शिष्यवृत्ती योजना | समाविष्ट अभ्यासक्रम | पालकांचे वार्षिक उत्पन्न | शिष्यवृत्तीचे दर | नोडल अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी प्री मॅट्रिक शिष्यवृत्ती. | इयत्ता 9 वी आणि 10 वी | **2.50 लाख** | डे स्कॉलरसाठी 500 रुपये दरमहा आणि वसतिगृहात राहणा-या विद्यार्थ्याकरिता 800 रुपये दरमहा शिष्यवृत्ती आणि पुस्तके अनुदान आणि विकलांग भत्ता ज्याची वार्षिक मर्यादा 2000 रुपयांपासुन ते 4000 रुपयांपर्यंत असु शकते. | संचालक, शिक्षण (माध्यमिक) |
| 2 | दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी प्री मॅट्रिक शिष्यवृत्ती. | इयत्ता 11 वी पासुन मास्टर डिग्री आणि डीप्लोमा स्तर. | **2.50 लाख** | विविध विषयात डिग्री डिप्लोमा इत्यादीतुन संबंधित स्नातकोत्तर, स्नातक, डिप्लोमा व्यावसायिक अभ्यासक्रमाकिरता देखरेख भत्याचे दर विविध आहेत. ही वसतिगृहात राहणा-या विद्यार्थ्यांकरिता 900-1600 रुपये दरमहा तसेच डे स्कॉलरसाठी 550-750 रुपये दरमहा मर्यादेत टयुशन शुल्क (अधिक वार्षिक मर्यादा 1.50 लाख रुपये) पुस्तक भत्ता आधिक विकलांग भत्ता ज्याची वार्षिक मर्यादा 2000 रुपयांपासुन ते 4000 रुपयांपर्यत असु शकते. | संचालक, उच्च शिक्षण विभाग, सेंट्रल बिल्डींग पुणे |
| 3 | दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी उच्च श्रेणी शिक्षण शिष्यवृत्ती | सर्वोत्कृष्टते करिता 241 अधिसुचित संस्थानात स्नातक स्नातकोत्तर डिग्री आणि डिप्लोमा | **6.00 लाख** | वसतिगृहात राहणा-या विद्यार्थ्यांकरिता 3000 रुपये दरमहा आणि डे स्कॉलरसाठी 1500 रुपये दरमहा, देखरेख भत्ता, वार्षिक पुस्तक अनुदान 5000 रुपये आणि वार्षिक टयुशन शूल्क 2.00 लाख रुपयांपर्यंत. उपकरणासह संगणक खरेदीसाठी खर्चाची परतफेड 30000/- (पुर्ण कोर्समध्ये एकदा) विशिष्ट दिव्यांगत्वाशी संबंधित आवश्यक 30,000/- (पुर्ण कोर्समध्ये एकदा) | संचालक, तंत्रशिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य |

## महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळ मर्या., मुंबई

**महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत उपक्रम**

**खोली नं. 74, तळमजला, गृह निर्माण भवन, (म्हाडा), वांद्रे (पूर्व), मुंबई 400 051**

**दूरध्वनी: 022-26591620 / 22 फॅक्स: 022-26591621**

**वेबसाईट: www.mshfdc.co.in ईमेल: md.mshfdc@maharashtra.gov.in**


| | | | |
|---|---|---|---|
| राष्ट्रीय महामंडळामार्फत राबविण्यात येणारी दिव्यांग स्वावलंबन कर्ज योजना राष्ट्रीय महामंडळाचा सहभाग 85/10/15% कर्ज मर्यादा रु. 50,000/- ते रु. 5 लाखापर्यंत राज्य महामंडळाचा सहभाग 05% लाभार्थी सहभाग 05/90% व्याजदर 5 वे परतफेडीचा कालावधी : 5 | महामंडळामार्फत राबविण्यात येणारी वैयक्तिक थेट कर्ज योजना कर्ज मर्यादा रु.50,000/- व्याजदर 2% परतफेडीचा कालावधी : 5 वर्ष | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन दिव्यांग आयुक्तालय, पुणे व दिव्यांग महामंडळामार्फत राबविण्यात येणारे महाशरद वेब पोर्टल www.mahasharad.in राज्यातील दिव्यांग व्यक्तींना विनामूल्य चाय्यक साधने / -उपकरणे उपलब्ध करुन देण्याकरीता | दिव्यांग व्यक्तींना स्वावलंबी करण्याच्या दृष्टीने हरित उर्जेवर चालणाऱ्या पर्यावरणस्नेही फिरत्या बाहनावरील दुकान (मोबाईल शॉप ऑन व्हेईकल) मोफत उपलब्ध करुन देणे बाबत |

## कर्ज मागणी अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे

1) 15 वर्ष महाराष्ट्रातील वास्तव्याचा दाखला/ डोमेसाईल सर्टिफिकेट

2) वयाचा दाखला/शाळा सोडल्याचा दाखला/ एस. एस. सी. बोर्ड प्रमाणपत्र / जिल्हा शल्य चिकित्सक प्रमाणपत्र / आधारकार्ड (वयाच्या पुराव्याबाबत कागदपत्रे) यापैकी कोणतेही एक.

3) सक्षम वैद्यकिय प्राधिकाऱ्यांनी दिलेला दिव्यांगत्वाचा दाखला (साक्षांकित सत्यप्रत) व 3 पासपोर्ट साईज फोटो

4) निवडणूक आयोगाचे ओळखपत्र / समाजकल्याण दिव्यांग ओळखपत्र / पॅनकार्ड यापैकी कोणतेही 1

5) जातीचे प्रमाणपत्र (अनिवार्य नाही)

6) (अ) व्यवसायाच्या जागेच्या उपलब्धतेचा पुरावा नमुना नं.8/करपावती/सिटी सर्व्हे उतारा / भाडेपावती नोटरी केलेले संमतीपत्र / भाडेकरार रु.100/- स्टॅम्पपेपरवर (Affidevit / प्रतिज्ञापत्र)

(ब) जागाधारकांचे 7) कुठल्याही बँकेचा तसेच वित्तीय संस्थेचा थकबाकीदार नसल्याबद्दल रु. 100/- च्या स्टॅम्पपेपरवर नोटरी केलेले प्रतिज्ञापत्र

8) वाहन कर्जाबाबत वाहन परवाना धारकाचे पूर्ण कर्जफेड होईपर्यंत व्यवसायास मदत करण्याचे / वाहन चालविण्याचे रु.100/- च्या स्टॅम्पपेपरवर नोटरी केलेले हमीपत्र

9) व्यवसायाच्या मालाचे सविस्तर दरपत्रक/ कोटेशन (दिनांकसहीत)

10) रु. 5 लाखाच्या वरील कर्ज प्रकरणाबाबत शासकीय कर्मचारी जामिनदाराची कागदपत्रे (पगारपत्रक, कार्यालयीन ओळखपत्र यांची झेरॉक्स प्रत), प्रकल्प अहवाल

19) शेतीविषयक कर्जासाठी अर्जदाराच्या नावे असणाऱ्या जमिनीचा 7/12 चा उतारा व 8अ चा उतारा

12) शेती व्यवसायासाठी पाण्याची पातळी उपलब्धतेबाबत भूजल सर्वेक्षण अहवाल दाखला (विहिर, बोअरवेल, मोटर पाईपलाईन)

13) मतिमंद सेरेब्रल पाल्सी/ऑटीझम अर्जदाराबाबत जिल्हा स्थानिक स्तर समिती कमिटीकडील पालकत्वनामा, 3 एकत्रित फोटो, पालकांचे रु. 100/- च्या स्टॅम्पपेपरवर नोटरी केलेले 14) मतिमंद अर्जदाराच्या बाबतीत अर्जावर पालकांची (Legal Guardian) सही असणे आवश्यक आहे.

15) विवाह नोंदणी दाखला/ विवाहानंतर नावात बदलाबाबत प्रतिज्ञापत्र / नावात बदलाचे गॅझेट (विवाहित महिला अर्जदारासाठी)

## अटी व शर्ती:

1) लाभार्थी हा महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा.

2) लाभार्थ्यांकडे दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान 40 टक्के असावे तसेच जिल्हा शल्य चिकित्सक / सक्षम प्राधिकारी यांनी प्रमाणित केलेला प्रमाणपत्र धारक असावा.

3) लाभार्थी हा 18 ते 55 या वयोगटातील असावा.

4) मतिमंद लाभार्थ्यांच्या बाबतीत त्यांचे कायदेश पालक अर्ज करण्यास सक्षम असतील.

5) दिव्यांग लाभार्थ्यांचे वार्षिक उत्पन्न रु.2.50 लाख पेक्षा अधिक नसावे.

6) लाभार्थी निवड करताना जास्त दिव्यांगत्व असलेल्यास प्रथम प्राधान्य दिले जाईल. त्यामुळे निवडीचा क्रम हा अतितीव्र दिव्यांगत्व ते कमी दिव्यांगत्व या क्रमाने राहील.

7) अतितीव्र दिव्यांगत्व असणाऱ्या दिव्यांग व्यक्तीस वाहन चालविण्याचा परवाना नाकारला असल्यास अशा परिस्थितीत देखील परवानाधारक नसलेल्या अतितीव्र दिव्यांग व्यक्तीच्या बाबतीत सोबत्याचा (Escort) सहाय्याने फिरता मोबाईल व्यवसाय करण्यास प्राधान्य दिले जाईल.

8) अर्जाच्या वेळी अर्जदाराने सर्व अटी मान्य असल्याचे तसेच संबंधीत वाहनाची योग्यती काळजी घेण्याचे बंधपत्र सादर करणे आवश्यक राहील.

9) जिल्हानिहाय लाभार्थ्यांची घोषणा दिव्यांगांच्या संख्येच्या प्रमाणात केली जाईल.

## कर्ज वितरण साठी जामिनदारांच्या अटी

* शासकीय / निमशासकीय जामीनदारांच्या कार्यालयातील आहरण / संवितरण अधिकारी यांच्या हमीपत्रासह किंवा
* कर्ज रक्कमेएवढे मुल्यांकन असलेली स्थावर जंगम मालमत्ता (शेतजमीन ) / व्यापारी गाळा / भुखंड महामंडळाकडे तारण ठेवणे आवश्यक आहे.
* महामंडळाकडून वेळोवेळी विहित केल्या जाणाऱ्या अटी व शर्ती

## कर्ज वितरण साठी जामिनदारांच्या अटी

* शासकीय / निमशासकीय जामीनदारांच्या कार्यालयातील आहरण / संवितरण अधिकारी यांच्या हमीपत्रासह किंवा
* कर्ज रक्कमेएवढे मुल्यांकन असलेली स्थावर जंगम मालमत्ता (शेतजमीन ) / व्यापारी गाळा / भुखंड महामंडळाकडे तारण ठेवणे आवश्यक आहे.
* महामंडळाकडून वेळोवेळी विहित केल्या जाणाऱ्या अटी व शर्ती.

**अस्थिव्यंग प्रवर्गातील महिला वगळून इतर प्रवर्गातील दिव्यांग महिलांना रक्कम रु.50,000/- पर्यंत व्याजदरात 1% सुट अनुज्ञेय आहे (NHFDC योजनांमध्ये)**

# अमरावती जिल्हयातील विशेष शाळा / कर्मशाळा - यादी

## अंध प्रवर्ग

| अ. क्र | शाळा नांव व पत्ता | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| 1 | डॉ. नरेंद्र भिवापुरकर अंध विद्यालय जेलक्वार्टर जवळ, अमरावती | 115 (निवासी) |
| 2 | आश्रित अंध कर्मशाळा जेलक्वार्टर जवळ, अमरावती | 50 (निवासी) |
| 3 | कै. स्वातंत्र सेनानी गोविंदराव बिजवे अंध विद्यालय, दर्यापूर | 30 (निवासी) |
| 4 | निवासी अंध विद्यालय, चिखलदरा | 80 (निवासी) |
| 5 | निवासी अंध विद्यालय, खानापुर | 50 (निवासी) |
| 6 | स्वामी विवेकानंद अंध विद्यालय, परतवाडा | 40 (निवासी) |

## मतिमंद प्रवर्ग

| अ. क्र | शाळा नांव व पत्ता | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| 7 | निवासी मतिमंद विद्यालय हिरमकर कॉलनी डेन्टल कॉलेज जवळ | 30 (निवासी) |
| 8 | प्रयास विशेष मतिमंद मुलांची शाळा अमरावती | 40 (अनिवासी) |
| 9 | असिसी विशेष मतिमंद मुलांची शाळा अमरावती | 40 (अनिवासी) |
| 10 | स्व.  दौलतभाई देसाई मतिमंद मुलांची शाळा अमरावती | 40 (अनिवासी) |
| 11 | मंदबुध्दी व शारिरीक अपंग विद्यालय, हर्षराज कॉलनी, अमरावती | 50 (अनिवासी) |
| 12 | स्व. गेंदीबाई श्रीनिवास अग्रवाल मतिमंद विद्यालय परतवाडा | 30 (अनिवासी) |
| 13 | निवासी मतिमंद विद्यालय ,आष्टी भातकुली ,अमरावती | 30 (निवासी) |
| 14 | अंबादासपंत वैद्य मतिमंद, मुक, बालगृह वझ्झर फाटा अचलपुर | 60 (निवासी) |
| 15 | निवासी मतीमंद विद्यालय ,सुरवाडी तिवसा, अमरावती | 50 (निवासी) |
| 16 | वासुदेवराव पाटील मतिमंद मुलांची शाळा, काकडा, ता. अचलपुर | 40 (निवासी) |
| 17 | निवासी मतिमंद विद्यालय, आसेगाव पुर्णा ता. चांदुर बाजार | 40 (निवासी) |

## मुकबधिर प्रवर्ग

| अ. क्र | शाळा नांव व पत्ता | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| 18 | श्री. बुलीदान राठी मुकबधिर विद्यालय अमरावती | 200 (निवासी) |
| 19 | नुतनं मुकबधिर विद्यालय अमरावती | 50 (निवासी) |
| 20 | लक्ष्मीकांत पसारकर मुकबधिर विद्यालय, अमरावती | 27 (अनिवासी) |
| 21 | मुकबधिर विद्यालय बिलायतपुरा, अचलपुर अमरावती | 40 (अनिवासी) |
| 22 | निवासी मुकबधिर विद्यालय, सुरवाडी तिवसा, अमरावती | 40 (निवासी) |
| 23 | निवासी मुकबधिर विद्यालय, दर्यापुर | 31 (निवासी) |
| 24 | निवासी मुकबधिर विद्यालय, सोनगांव, चांदूररेल्वे, अमरावती | 40 (निवासी) |
| 25 | साळुंकाबाई चिचोळकर मुक. विद्या निवासी, कापुसतळणी | 60 (निवासी) |
| 26 | संत गाडगेबाबा निवासी मुकबधिर विद्यालय, परतवाडा | 40 (निवासी) |
| 27 | निवासी मुकबधिर विद्यालय, चांदुर रेल्वे, अमरावती | 40 (निवासी) |
| 28 | निवासी मुकबधिर विद्यालय, आसेगाव पुर्णा, चांदुरबाजार, अमरावती | 40 (निवासी) |
| 29 | श्री. प्रभु मुकबधिर विद्यालय, रिध्दपुर, अमरावती | 25 (निवासी) |
| 30 | निवासी मुकबधिर विद्यालय, टोंगलापुर फाटा, मासोद, ता. चांदुर बाजार | 50 (निवासी) |

## अस्थिव्यंग प्रवर्ग

| अ. क्र | शाळा नांव व पत्ता | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| 31 | राष्ट्रीय अपंग कल्याण संसथा नॉफ, मार्डी रोड अमरावती | 60 (निवासी) |
| 32 | वसंतराव नाईक अपंग कर्मशाळा, अमरावती | 60 (निवासी) |
| 33 | आदर्श अपंग निवासी विद्यालय, टेम्ब्रूसोंडा | 25 (निवासी) |

# जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र अमरावती
## (District Disability Rehabilitation Center Amravati

केंद्र शासनाने महाराष्ट्र राज्यातील सतरा जिल्ह्यांमध्ये जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्रे निश्चिती केलेली आहे. यामध्ये अमरावती जिल्ह्यातील अपंग जीवन विकास संस्था अमरावती या संस्थेला जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र मंजूर करण्यात आले आहे. या केंद्रामार्फत दिव्यांगांसाठी मोफत यु डी आय डी कार्ड नोंदणी, तसेच दिव्यांग साहित्य वाटप इत्यादी उपक्रम राबविण्यात येतात. जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र अमरावतीचे संचालक म्हणून श्री. किशोर बोरकर हे काम पाहतात. केंद्र सरकारने 2022-23 मध्ये देशातील 25 मॉडेल जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्रांची निवड केली आहे. यामध्ये अमरावतीचे जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र हे मॉडेल जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र म्हणून घोषित केले आहे.




TheHitavada
Vidarbha Line | 2022-09-01 | Page-3
ehitavada.com

**Amravati's Disability Rehabilitation Centre among country's 25 best, matter of pride'**

■ Amravati Bureau
AMRAVATI, Aug 31

"OUT of the 516 District Disability Rehabilitation Centres in the country, 25 District Disability Rehabilitation Centres have been selected as model centres and they include centre from Amravati which is a matter of pride," said Pavneet Kaur, Amravati District Collector and ex-officio President of District Disability Rehabilitation Centre, directing officials to show sensitivity while implementing various schemes for differently-abled persons.

Kaur was addressing a programme organised for distribution of useful equipment to disabled and felicitations of meritorious students. The programme was organised by District Disability Rehabilitation Centre run by Apang Jeevan Vikas Sanstha, Amravati in association with Sant Gadge Maharaj Vidyalaya and Junior College organised at Sant Gadge Maharaj Vidyalaya, Nawathe plot recently.

Dr Sunil Deshmukh, former Guardian Minister, Rajendra Jadwar, District Social Welfare Officer of Zilla Parishad, Kishor Borkar, President of Apang Jeevan Vikas Sansthan, Dr Subhash Gavai, Principal, Ganesh Patil, former Vice Chancellor, Dr B R Deshmukh, Dr Dinesh Gawali and other dignitaries were present on the dais. Pavneet Kaur, Dr Sunil Deshmukh, Kishor Borkar distributed tricycles, hearing aids to the disabled people on the occasion. Meritorious students were felicitated with certificates, medals and bouquets by dignitaries. Kishor Borkar delivered the introductory remarks. Vasundhara Chavare, Ex-Principal organised the programme and RS Konde, Project Director proposed the vote of thanks.

Jagdish Govardhan, President of Saachi Foundation, Prof. Anil Deshmukh, Raja Chaudhary, Dinesh Khodke, Bhaiyya Nichal, Asha Agham, Anila Kaji were present at the event. Teachers and non-teaching staff including Principal Kishor Bansod, Pramod Dankhade, Abhishek Alkari, Sadhana Raut, Savita Rathod, Bhagyashri Ramekar worked tirelessly to make the ceremony a success.

Ruing that recruitment of disabled persons in various Government departments has stopped, Kishor Borkar in his speech, urged District Collector Pavneet Kaur to fill the backlog of jobs of disabled. The vision of Dr Sunil Deshmukh during Corona pandemic proved helpful in establishing oxygen plant and other necessities at District General Hospital, he said.

"Only a disabled can understand the suffering of the disableds", said Dr Sunil Deshmukh in his address. Kishor Borkar dedicated himself to work for disabled. It is because of the hard work of Kishor Borkar that the District Disability Rehabilitation Centre in the State has become model one, stressed Dr Deshmukh. He appealed administration as well as society to stand by Kishor Borkar for such social cause.

Rajendra Jadhwar acknowledged that during his undeclared visit to the District Rehabilitation Centre he found excellent work being done. The selection of District Rehabilitation Centre at Amravati among 25 model centres across the country is a matter of pride for the Amravati, said Jadhawar adding that Dr Subhash Gavai said tahat Kishore Borkar is a leader who will strive for the rights of the disabled. He has a vision and is working for them.

(Above) District Collector Pavneet Kaur addressing the programme. (Below) Pavneet Kaur, Dr Sunil Deshmukh and others presenting tricycle to one of the physically challenged persons.

Powered by iDocuments





धर्म . समाज . संस्था

निवड • जिल्हाधिकारी पवनीत कौर म्हणाल्या, ही जिल्ह्यासाठी अभिमानास्पद बाब

**देशातील २५ मॉडेल केंद्रांमध्ये अमरावतीच्या अपंग विकास संस्थेच्या पुनर्वसन केंद्राचे नाव**



# दिशा प्रकल्प

## दिशा प्रकल्पाची सुरुवात

जानेवारी 2019 मध्ये,जय वकील फाउंडेशन आणि सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. त्यानुसार जय वकील फाउंडेशन आणि दिव्यांग कल्याण आयुक्तालय यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्यात 2019 मध्ये प्रकल्पाची सुरवात करण्यात आली. IEP साठीची मूल्यांकन चेकलिस्ट व 3-14 वर्षे आणि 14-18 वर्षे वयोगटातील अभ्यासक्रम हा नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर इम्पॉवरमेंट ऑफ पर्सन्स विथ इंटेलेक्चुअल डिसॅबिलिटी (दिव्यांगजन) (NIEPID) या राष्ट्रीय संस्थेने प्रमाणित केलेला आहे.

## दिशाचे प्रकल्पांतर्गत देण्यात येणाऱ्या मुख्य बाबी - (Main Offering of Disha)

## दिशा विशेष शिक्षक प्रशिक्षण

दिशा प्रशिक्षणे हा दिशा प्रकल्पातील महत्वाचा भाग आहे. प्रशिक्षणातील विषय-

- IEP स्कोअरिंग आणि ध्येय निवड
- दिशा अभ्यासक्रम व अध्यापन पद्धती (VAKT/ITA)
- दिशा वेब पोर्टल
- वर्ग व्यवस्थापन

## अमरावती जिल्हयामध्ये मतिमंद प्रवर्गाच्या सर्व शाळांमध्ये दिशा प्रकल्पाची अंमलबजावणी सुरु आहे.

## बहुसंवेदी अभ्यासक्रम - शिक्षक पुस्तिका आणि विद्यार्थी कार्यपुस्तके

- अभ्यासक्रम बौद्धिक अक्षम प्रवर्गातील 3 ते 18 वयोगटातील सर्व IQ गटातील (Borderline to Severe &
- Profound)
- विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त आहे. संपूर्ण अभ्यासक्रम VAKT (Visual, Auditory, Kinesthetic, Tactile शिक्षण पद्धती ITA (Interest Teach and Apply) आणि या तत्वावर आधारित आहे.
- शिक्षक-पुस्तिकेमध्ये एक कृती कशी शिकवली गेली पाहिजे याचे सविस्तर वर्णन केले आहे त्याअनुषंगान विद्यार्थी कार्यपुस्तिकेमध्ये ती कृती विद्यार्थाने पूर्ण करायची आहे.
- स्तर - नर्सरी, स्तर 1, स्तर 2, स्तर - 3 आणि पूर्व व्यावसायिक
- विषय - पर्यावरण विज्ञान, भाषा, गणित, कार्यात्मक (ADL), जीवन कौशल्ये आणि स्वयंपाकघर कौशल्य (प्रीव्होकेशनल)

## स्वतंत्र दिशा वेब पोर्टल

- तंत्रज्ञानाचा योग्य वापर करुन सर्व डेटा आणि पुरावे जतन करण्यासाठी दिशा वेब पोर्टल डिझाइन केले आहे. दिशा पोर्टल फायदे:
- हे पोर्टल खास IDD शाळांसाठी बनवलेले आहे आणि सर्व भागधारक- शिक्षक, शाळा, जिल्हा कार्यालये आणि आयुक्त कार्यालय यांच्यासाठी अनेक फायदे आहेत.
- शिक्षक आणि शाळा IEP साठी मूल्यांकन चेकलिस्ट भरु शकतात, ध्येय निवडू शकतात, मूल्यांकन करु शकतात रिपोर्ट कार्डचे प्रिंटआउट घेऊ शकतात आणि अभ्यासक्रम डाउनलोड करु शकतात.
- वापरकर्ता अनुकूल बहुभाषिक - [इंग्रजी, हिंदी, मराठी] असे आहे, अहवाल तयार करणे आवश्यक आहे.
- पोर्टल प्रवेशयोग्य आहे यामध्ये विविध उपकरणांद्वारे माहिती भरली जाऊ शकते - लॅपटॉप, टॅब्लेट आणि फोन

## अमरावती जिल्हयामध्ये मतिमंद प्रवर्गाच्या सर्व शाळांमध्ये दिशा प्रकल्पाची अंमलबजावणी सुरु आहे.

दिशा प्रकल्पांतर्गत सर्व प्रक्रिया परिणामकारकपणे पार पाडल्या जाव्यात आणि शाळांचा अधिकाधिक सहभाग वाढावा म्हणून  विविध माध्यमातून शाळांची सततचा संपर्क ठेवला जातो. तसेच प्रत्येक टप्प्यावर शिक्षकांचा अभिप्राय घेतला जातो, व त्याचा समावेश प्रकल्पामध्ये केला जातो. त्याकरिता प्रत्येक विभागाला विभाग समनव्यक नेमण्यात आले आहेत.













